दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १७२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२२ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## घरफोडीत ९ लाखांचा ऐवज केला लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील बारापाडा गावामध्ये अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत ९ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.

तालुक्यात चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. चोरी करण्यासाठी चोरटे नवनवीन क्लुप्त्या काढीत आहेत. पनवेल तालुक्यातील बारापाडा गावात एका घरात घुसून १३ ते १५ तोळे सोन्याचे दागिने आणि जवळपास दीड लाखांची रोकड चोरट्यांनी लंपास केला आहे. रात्री ३च्या सुमारास अज्ञात चोर घरावर चढून घराची कौले काढून आत प्रवेश केला. घरातील कपाट फोडून त्यात असणारे १३ ते १५ तोळे सोन्याचे दागिने आणि जवळपास दीड लाखांची रोकड चोरट्यांनी लुटली आहे. पनवेल पोलीस पुढील तपास करत आहेत.

# राज्यात सध्या बाप पळवणारी टोळी फिरते : उद्धव ठाकरे

## मुंबई महापालिका निवडणूक एक महिन्यात घेऊन दाखवा



**मुंबई: महाविकास आघाडी सरकार कोसळल्यापासून शिवसेना आणि भाजपमध्ये तणाव वाढला आहे. यातच आज शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर सभेतून भाजप आणि शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला. सध्या राज्यात बाप पळवणारी टोळी फिरतीय, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली. तसेच, संजय राऊत एकटे लढत आहेत, मोडेन पण वाकणार नाही, असा आमचा संजय आहे, अशा शब्दात त्यांनी राऊतांचे कौतुक केले.**

### अमित शहांना अस्मान दाखवू : उद्धव ठाकरे

**अलीकडेच गणेशोत्सवाच्या निमित्ताने अमित शाह यांचा मुंबई दौरा झाला. यावेळी अमित शाह यांनी शिवसेनेला जमीन दाखवण्याची भाषा केली होती. उद्धव ठाकरे यांनी मेळाव्याला संबोधित करताना पहिलाच पलटवार भाजपचे केंद्रीय नेतृत्व असलेल्या अमित शाहांवर केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास ऐकत आम्ही मोठे झालो आहोत. तेव्हापासून महाराष्ट्रात आदिलशाह, निजामशाह असे अनेक जण आले आणि गेले. त्यातीलच एक हे अमित शाह आहेत, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरेंनी केली.**

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईच्या गट प्रमुखांच्या मेळाव्यात एकनाथ शिंदे यांचा गट आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. भाषणाच्या सुरुवातीलाच संजय राऊत यांच्या अटकेचा दाखला देत भाजपवर हल्लाबोल केला. मुंबईसाठी शिवसैनिकांचा त्याग, शिंदे गटाचा मिंधे गट असा उल्लेख आणि वेदांता प्रकरणावरुन उद्धव ठाकरेंनी टीका केली. जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो मातांनो भगिणींनो, आज ही गर्दी असेल तर दसऱ्याला किती पट असेल. आपला दसरा मेळावा शिवाजी पार्कवर होणार आहे. असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मुलं पळवणारी टोळी ऐकलेय पण बाप पळवणारी औलाद महाराष्ट्रात फिरतेय.आजपर्यंत आपण त्यांना सत्तेचं दूध पाजलं पण आज त्यांची गटारगंगा झालेली आहे. विशेष म्हणजे मुंबईचे लचके तोडणारी गिधाडं फिरायला लागली आहेत. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचत वाचत मोठे झाले आहोत. सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करताना अनेक शहा स्वराज्यावर चालून आले होते. मध्ये येऊन गेले त्या कुळातील आताचे शाह म्हणजे आताचे देशाचे गृहमंत्री ते म्हणाले शिवसेनेला जमीन दाखवा असे म्हणाले. इकडं असलेली गवताची पाती नाहीत तलवारीची पाती आहेत. गिधाडं हा शब्द जाणीवपूर्वक वापरला. मुंबईची निवडणूक आल्यानंतर तुम्ही येता, मुंबईवर संकट आल्यानंतर तुम्ही कुठं असता?, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

या शिवसेनेनं तुम्हाला मोठं केलं. तुम्हाला पद दिली. येताना रस्त्यावर पाहत होतो सुरत २३२ कि.मी. किती लांब जावं लागलं ढोकळा खायला, अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे आणि समर्थक आमदारांवर हल्लाबोल केला.

आज मी मुंबईवर बोलणार आहे. मुळात तुमच्यावर बोलताना कमळाबाईचा आणि मुंबईचा संबंध काय? कमळाबाई हा शब्द बाळासाहेबांचा आहे. ही तिच शिवसेना आहे, हे पाहिल्यानंतर पुन्हा मुंबईवर दावा करु नका. वंशवादावरुन आमच्या घराण्यावर टीका होते. या मुंबईवर वाकडी नजर पडली आहे त्यावेळच्या संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत जनसंघ नव्हता. संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली होती त्याच्या पहिल्या पाच अग्रणी होते त्यात माझे आजोबा होते. मेलो तरी बेहत्तर मुंबई महाराष्ट्राला मिळाली पाहिजे अशी स्थिती असताना निवडणुकीच्या वेळी जागा वाटपाचं नाटक करुन जनसंघ समिती फोडून बाहेर पडला. जनसंघ त्यातून बाहेर पडला. पण आपण दुर्दैवानं त्यांच्याबरोबर युती केली. मी पुन्हा बोलतो, आपली २५ वर्ष युतीत सडली, असं पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

आपला महापौर आणि त्यांना उपमहापौर पद दिलं. एवढे बाहेरचे उपरे नेते आणले आहेत. बावनकुळे किंवा एकशे बावनकुळे बाष्कळ बडबड कशाला करता, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. धारावीत आम्ही आर्थिक केंद्र उभारणारचं आहोत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

वेदांता प्रकल्प गेलाच ना? आमच्या मुळं किंवा तुमच्या मुळं गेला असं करतात. वेदांता प्रकल्प माघारी आणण्यासाठी आम्ही तुमच्यासोबत आहोत. महाराष्ट्रातून वेदांता प्रकल्प गुजरातला गेला कसा असा सवाल नरेंद्र मोदींना विचारा, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबईकर शिवसेनेवर विश्वास का टाकतात हे जाणून घ्या. शिवसेना म्हटल्यावर विकास आहे. नैसर्गिक आपत्ती असल्यावर किंवा कसाबचा हल्ला असो, २५ आणि २६ जुलैचा महापूर असो, त्याच्यानंतर दोन दिवस सर्व शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी शिवसैनिकांमुळं मुंबईवरुन संकट टळलं,असं उद्धव ठाकरे म्हणाले.

संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील घडामोडी तुम्हांला माहित हव्यात. जनसंघ हा समिती फोडणारा, ही त्यांचीच औलाद आहे. पंचवीस वर्ष युतीत आमची सडली, कुजली. ही सगळी नालायक माणसं आपण जोपासली. विनासायास यांना उपमहापौर पद मिळालं... मेहनत करायची शिवसैनिकांनी. वंशवाद म्हणजे काय? मला माझ्या घराण्याचा अभिमान आहे... तुमचा वंश कुठला? सगळे बाहेरचे घेतले भरले आहेत... वंशवाद म्हणजे काय? मला माझ्या घराण्याचा अभिमान आहे. तुमचा वंश कुठला? असा सवाल उद्धव ठाकरेंनी या वेळी उपस्थित केला आहे.

### मुंबई महापालिका निवडणूक एक महिन्यात घेऊन दाखवा, उद्धव ठाकरेंचे अमित शाहांना आवाहन

शिवसेना पक्ष प्रमुख यांनी मुंबईतील शिवसेनेच्या गट प्रमुखांच्या मेळाव्यात ढीगभर गद्दार सोबत असण्यापेक्षा मुठभर निष्ठावान असले पाहिजेत. देवेंद्र फडणवीसांच्या आयुष्यातील शेवटची निवडणूक आहे. आपल्या आयुष्यातील पहिली निवडणूक असल्यासारखी लढा, असं आवाहन उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांना केलं. आपल्याकडे काही नाही असं समजा, ही पहिली निवडणूक आहे असं समजा. मुंबई महापालिका बरखास्त झाली आहे. आमदार गेले, खासदार गेले ती जागा पडलेली आहे असं समजा आणि तिथं भगवा



फडकवण्यासाठी कामाला लागा, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

२०१२ साली आपण करुन दाखवलं या दोन शब्दांवर जिंकलो होतो. २०१७ हे माहिती आहे का हे सांगितलं. आम्ही जे बोलतो ते करुन दाखवतो. पुढच्या आठवड्यात पंतप्रधान मुंबईत येणार आहेत. मुंबई महापालिकेवर कब्जा मिळवण्यासाठी पंतप्रधान येत आ-हेत, गृहमंत्री आहेत, आपले गद्दार आहेत, मुन्नाभाई आहे पण आपण त्याच लढाईची वाट पाहतोय. आपल्याला जमीन दाखवणाऱ्यांना अस्मान दाखवण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे का? शिवसैनिकांच्या पाठबळावर अमित शाहांना आव्हान देतो, तुम्ही हिंदू मुस्लीम करुन बघा, मुस्लीम समाज आमच्यासोबत आहे. मराठी अमराठी करुन बघा, अमराठी आमच्यासोबत आहेत. कारण करोना काळात मी सर्वांचे प्राण वाचवले आहेत. १९९२ -९३ च्या दंगलीवेळी शिवसैनिकांनी दर्ग्याचं संरक्षण केलं होतं. तोडा फोडा आणि राज्य करा ही शाह निती यशस्वी होणार नाही. म्हणून अमित शाहांना आव्हान देतो, तुमच्या चेल्या चपाट्यांना सांगा हिंम्मत असेल तर मुंबई महापालिकेची निवडणूक एका महिन्यात घेऊन दाखवा, त्यानंतर विधानसभेची निवडणूक घ्या, असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं.

## महानगरपालिकेच्या निवडणुकी करीता जनजागृतीचा अभाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१८८ पनवेल विधान सभा मतदार संघात लवकरच महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहेत, त्याची पुर्व तयारी सुरू झाली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. सद्य स्थितीत पनवेल महानगरपालिकेचा कारभार प्रशासकीय अधिकारी म्हणुन आयुक्त गणेश देशमुख हे पाहत आहेत. विविध राजकीय पक्षाने आतापासुनच आपल्या प्रभागातील गाठी भेटींवर भर दिला आहे. आपापल्या प्रभागात गेल्या ५ वर्षात कश्याप्रकारे कामे झाली आहेत त्याची माहिती प्रभागातील जनसंपर्कातून लोकप्रतिनिधी करीत आहेत. भविष्यात येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कारभार हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी पनवेल यांच्याकडे आहे. परंतु त्यांच्याकडून निवडणुकी करीता आवश्यक असलेली जनजागृती केल्याचे दिसून येत नाही. डीजीटल इंडीयाचा नारा झाला खरा, परंतु त्याची कास धरून निवडणुक ओळखपत्रास आधार लिंक करण्याकरीता व्होटर आयडीचे ॲप सोप्या पध्दतीने नागरीकांना समजेल याची जनजागृती न करता अथवा याचे महानगरपालिका हद्दीत विशेष शिबीर न घेता अथवा बॅनर बाजी न करता केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेतील सुमारे ९६ कर्मचारी व अधिकारी यांना बी.एल.ओ.ची ऑर्डर काढुन तोंडी सज्जड दम देऊन कामाला जुंपले आहे.

आधीच पनवेल महानगरपालिकेच्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे आयुक्त गणेश देशमुख यांची महानगरपालिकेचा कारभार हाकत असताना तारेवरची कसरत होत आहे. या सर्व गोष्टींचा पनवेल महानगरपालिकेच्या कामकाजावर तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन कामावर विपरित परिणाम होवू शकतो असे नागरिकांत बोलले जात आहे.

**या बाबत प्रांताधिकारी यांच्याशी सविस्तर माहीती घेण्याबाबत भ्रमणध्वनी केला असता संपर्क होऊ शकला नाही.**

### पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

## १ लाखांची लाच घेताना पोलीस निरीक्षक गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस कर्मचाऱ्यांची इच्छित स्थळी बदली करण्यासाठी १लाख रुपयाची लाच मागणारे, महामार्ग सुरक्षा पथक पनवेल विभागाचे पो-लीस निरीक्षक रामचंद्र नारायण वारे याना १ लाख रुपयांची लाच स्वीकारताना मंगळवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांच्या पथकाने रांगेहात अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी २० सप्टेंबर रोजी उशिरा झाली आहे.

महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस निरीक्षक रामचंद्र नारायण वारे वय ५८ वर्ष यांनी, आपल्या पोलीस दलातील सहकारी अधिकारी तसेच कर्मचारी यांची इच्छित स्थळी बदली करण्यासाठी साठी दोन कर्मचाऱ्यांकडून १ लाख रुपयांची मागणी केली होती १ लाख रुपये दिल्या नंतर तत्काळ बदली होईल अशे आश्वासन वारे यांनी त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांना दिले होते, त्या नुसार १ लाख रुपयांची जुळवाजुळव दोन पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांनी केली होती.

तसेच या पोलीस अधिकाऱ्यांनी या लाचेची माहिती पालघर लाचलुचपत विभागाला दिली होती, त्या नुसार पालघर पथकांनी मंगळवारी सापळा रचून वारे याना त्याच्या केबिन मध्ये लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली आहे., वारे यांनी त्यांच्या पोलीस अधिकाऱ्यांना पैसे घेऊन केबिन मध्ये बोलवले होते, त्या नुसार लाच घेताना त्यांना अटक करण्यात आली आहे.

## गाढी नदीवरील विचुंबे गाव ते नविन पनवेल यांना जोडणारा नविन पुल उभारणीसाठी तातडीने निधी मिळावा

### आ.प्रशांत ठाकूर यांची नामदार रविंद्र चव्हाण यांच्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील गाढी नदीवरील विचुंबे गाव ते नविन पनवेल यांना जोडणारा नविन पुल उभारणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनही मंत्री महोदयांना दिले आहे.



या शिष्टमंडळात विचुंबे गाव भाजपा अध्यक्ष के. सी.पाटील, विचुंबे ग्रामपंचायत उप सरपंच प्रमोद भिंगारकर, माजी उप सरपंच किशोर सुरते, नितीन भोईर, अनील भोईर, अविनाश गायकवाड, अनंत गायकवाड, महेश भिंगारकर, डी के भोईर चेतन सूरते, दामाजी भिंगारकर, संजय भिंगारकर, गोरख धुमाळ आदींचा समावेश होता.


नामदार रवींद्र चव्हाण यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्रातील वाह्य रस्ते विकास योजने अंतर्गत पनवेल तालुक्यातील गाढी नदीवरील विचुंबे गाव ते .../२

## जेएनपीएच्या स्पिडी गोदामातून १७२५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**दै.रायगड नगरी । उरण**

**जेएनपीटीच्या गोदामातून एक संशयित कंटेनर ताब्यात घेतला असून त्यामध्ये तब्बल १७२५कोटी रूपयांचे २२ टन संशयित अंमली पदार्थ असल्याचे बोलले जाते. हा अंमली पदार्थ हेरॉईन असल्याचे बोलले जात असले तरी ही आयुर्वेदीक पावडर असल्याचे बोलले जाते. जर हे हेरॉईन असेल तर तर त्याची आंतराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत १७२५ कोटी रूपयांपर्यंत आहे.**

दिल्ली मधून स्पेशल सेल चे पोलिस आणि दिल्लीचे नार्कोटिक विभागाकडून ही कारवाई सूरू आहे. गेल्या वर्षी हा कंटेनर कस्टम विभागाने संशयित म्हणून थांबवून ठेवला होता. कंटेनर स्कॅनिंग वेळेस कंटेनरमध्ये कोणता माल आहे याची स्पष्टता न झाल्याने हा कंटेनर होल्ड करून ठेवला होता. गेल्यावर्षी आलेला या कंटेनरचे वजन आणि सील तेच असल्याची माहीती आहे. सध्या दिल्ली स्पेशल सेलचे पोलिस आणि नार्कोटीक विभागाकडून या मालाची तपासणी करण्यात येत असून तपासणी नंतर ते हेरॉईन आहे की आयुर्वेदिक पावडर आहे हे सिद्ध होईल. दिल्लीचे पोलिस मंगळवार दि.२० पासून या कंटेनरची तपासणी करत आहेत. जेएनपीएच्या स्पिडी सिएफएस मध्ये हा संशयित कंटेनर आहे. या सिएफएस मध्ये यापूर्वी अनेक वेळा अंमली पदार्थ आणि रक्तचंदन पकडले गेले आहे. संशयित कंटेनर आणि कस्टम विभागाने पकडलेल्या मालाचे कंटेनर या सिएफएस मध्ये साठवून ठेवले जातात. सध्या या गोदामात अनेक संशयित कंटेनर असून या परिसरात कोणालाही जाण्यास अनुमती दिली जात नाही. दरम्यान या कारवाई बद्दल न्हावा-शेवा पोलिस, आयबी आणि सिमा शुल्क विभागाला देखिल कोणतीही माहिती नाही.



# गाळपाची कसोटी

अतिपावसाने घायकुतीला आलेल्या शेतकऱ्यांना परतीच्या पावसाच्या बातमीने हायसे वाटले असले तरी प्रत्यक्षात निसर्गाच्या लहरीपणाचा सर्वाधिक फटका यंदा बसत असल्याने ही आनंदाची बातमी केव्हा दु:खात परावर्तित होईल, हे सांगता येणार नाही. अतिवृष्टीने कहर तर केला आहेच; पण अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस कोसळल्याने शेतजमीन अक्षरश: खरवडून गेली आहे. शेतात मातीचा अवशेषच शिल्लक राहिला नसताना, भविष्यात शेती तरी कशी करायची, असा प्रश्न काहींना जरूर पडला असेल. आणखी किती दिवस पर्जन्याचा असा दाह सोसावा लागणार, या विवंचनेत शेतकऱ्यांसहित सामान्य नागरिकही आहेत. या पार्श्वभूमीवर यंदा पुन्हा एकदा साखरेचे अतिरिक्त उत्पादन होण्याचा अंदाज छाती दडपविणारा आहे. मागील हंगामातील ६० साठ लाख मेट्रिक टन साखरेचा साठा अजूनही शिल्लक असताना, येऊ घातलेल्या अंदाजे १३८ लाख मेट्रिक टन साखरेचे करायचे काय, अशी चिंता सरकारला पडणे स्वाभाविक आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांनी आधीच गांगरून गेलेल्या सरकारने शेतीहिताचे काही चांगले निर्णय नक्कीच घेतले; पण तरीही निर्यातीतील धरसोडीमुळे शेतीमालाच्या परकीय बाजारपेठेची शाश्वती राहिलेली नाही. गतवर्षी अतिरिक्त उसामुळे कारखाने बराच काळ चालवावे लागले. परिणामी उतारा घटला. साहजिकच दर कमी मिळाला. शेतकरी संघटनांना स्वाभाविकच आंदोलनाचे अस्त्र मिळाले. भविष्यातील हे सारे सव्यापसव्य टाळण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन गाळप हंगाम महिनाभर आधी म्हणजे १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यासोबतच घसघशीत 'एफआरपी'(रास्त व किफायतशीर दर) जाहीर करून टाकला. वरकरणी हा निर्णय दिलासादायक वाटेल. परंतु, दिवाळीनंतरच्या पंधरवड्यातच ऊसतोड कामगार येऊ शकतात, ही वस्तुस्थिती नजरेआड करता येणार नाही. यंदा दिवाळी ऑक्टोबरच्या अखेरीस असल्याने तत्पूर्वी काहीतरी जुगाड करून ऊसतोड सुरू झाली तर आनंदच आहे. प्रत्यक्षात तसे होण्याविषयी उत्पादक शेतकरी व कारखानदारच साशंक आहेत. मराठवाड्याच्या दुष्काळी भागातील कामगार स्वत:च्या शेतीची व इतर कौटुंबिक कामे आटोपून मगच बाहेर पडतात. वर्षानुवर्षे हे असेच चालत आले आहे. गेले दोन-तीन वर्षे मराठवाड्यातही पावसाने आबादानी केल्याने तेथील शेतीची कामेही वाढली आहेत. 'एफआरपी'साठी चार विभाग केले असून, पश्चिम महाराष्ट्र वगळता इतरत्र उतारा शक्यतो दहाच्या आतच असतो. दहा टक्क्यांच्या पुढे उतारा असल्यासच तीन हजार ५० रुपये 'एफआरपी' मिळू शकेल. विदर्भ, मराठावाडा व उत्तर महाराष्ट्रात उतारा आठ ते नऊ टक्के पडतो. परिणामी दोन हजारांच्या आतच भाव मिळू शकेल, असे दिसते. तरीही, सरकारने ठरविल्यानुसार सगळे काही साग्रसंगीत पार पडले तर आनंद आहेच; परंतु, तसे झाले नाही तर काय? प्राप्त परिस्थितीत पर्यायी उपायांचाही विचार आजच करायला हवा. सुदैवाने गेल्यावर्षीपासून साखरेची किमान विक्री किंमतही सरकारने निश्चित केल्याने कारखान्यांना फारशी तोशीस पडणार नाही, असा एक आशावाद आहे. शिवाय, इथेनॉलच्या वापराबाबत प्रोत्साहन असल्याने त्याचाही फायदा भाव देताना होऊ शकेल. गेल्या हंगामात दोनशे कारखान्यांनी दोन कोटी मेट्रिक टनांपेक्षा अधिक उसाचे गाळप केले. यंदा २०३ साखर कारखाने सुरू होतील, असा अंदाज आहे. त्यातून १३८ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. गतवर्षी १३७ लाख टन उत्पादन करून महाराष्ट्राने उत्तर प्रदेशाला मागे टाकले. यावेळीही हे समाधान निश्चित मिळेल. मात्र, एक लाख हेक्टरवर वाढलेले लागवड क्षेत्र, अतिरिक्त ऊस वेळेवर गाळप करणे व त्यानंतर विक्रमी साखरेची योग्य दरात विल्हेवाट लावणे, ही आव्हानेही पेलावी लागतील. साखर उत्पादनात देशात अव्वल स्थान मिळविल्याचे गुलाबी चित्र रंगवितानाच, त्याच्या पोटातील शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे करडे रंग दुर्लक्षिता येणार नाहीत. बीड जिल्ह्यातील हिंगणगावात शिल्लक उसाच्या फडातच शेतकऱ्याने स्वत:ला जाळून घेत आत्महत्या केली होती, यावरून ऊस प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येते. उसाबरोबरच कांद्याच्या समस्येबाबतही शासनाने नुकतेच काही निर्णय घेतले. अतिपावसाने साठवलेला कांदा सडत असताना, 'नाफेड'ला तो खरेदी करण्याची विनंती करणे म्हणजे 'बैल गेला अन् झोपा केला' असा प्रकार झाला. वास्तविक आधीच सरकारी खरेदीचा निर्णय घेतला असता तर आज कांदा उत्पादकांवर अश्रू ढाळण्याची वेळ आली नसती. दिवसागणिक निसर्गाच्या लहरीपणाचे फटके वाढत आहेत. अशा स्थितीत आपत्कालीन व्यवस्था अधिक मजबूत करायला हवी. हवामान बदलाच्या परिणामी शाश्वत पीक म्हणून शेतकऱ्यांपुढे सध्या उसासारख्या नगदी पिकाचा पर्यायही किफायतशीर राहिला नाही तर पर्यायी पीकपद्धतीबरोबरच, बदलत्या पर्यावरणात तग धरू शकतील, अशा पिकांच्या जाती तयार कराव्या लागतील. संशोधनाच्या क्षेत्रात एकूणच आनंदी आनंद असल्याने हाताशी आहे ते निर्धारपूर्वक जपणे, वृद्धिंगत करणे याला पर्याय नाही.

# माथेरानमध्ये मुले पळवणारी टोळी सक्रिय मुलाला पळवण्याचा झाला प्रयत्न असफल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण एक शून्य आहे परंतु काल माथेरान मध्ये घडलेल्या घटनेने माथेरान मध्ये येथील वातावरण पूर्ण ढवळून निघाले असून एका लहान मुलाला कळविण्याचा असफल प्रयत्न झाला काही नागरिकांच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न हाणून पाडल्यामुळे मोठी दुर्घटना टळली असली तरी माथेरान मध्ये मुले पळवणारी टोळी सक्रिय झाली आहे ही घटना चिंताजनक असून त्यामुळे येथे चिंतेचे वातावरण पसरले आहे.

काल सायंकाळी साडेसातच्या दरम्यान लूकमान शेख हा साडेनऊ वर्षाचा मुलगा येथील मुस्लिम महिला येथील अरबी शाळेमध्ये निघालेला असताना रस्त्यामध्ये दोन इसमानी आवाज देऊन थांबण्यास सांगितले ह्यावेळी तुरळक पाऊस दाट धुके व विज ही नसल्याने लुकमान ला कोणीतरी ओळखीचे आवाज देत आहे असे वाटल्याने तो थांबला व त्यावेळेस या दोन इस्मानी त्याच्या हाताला धरून माथेरान प्रवेशद्वार दस्तुरी कडे घेऊन जात होते छोट्या लुकमान ला काहीही कळत नसताना तो घाबरला होता परंतु त्याचवेळी श्री सदस्य बैठकीसाठी जात असताना दोघेजण ह्या रस्त्याने आले व त्यांना हा प्रकार निदर्शनास आला त्याचवेळी लूकमान ने त्या दोघांना मदतीसाठी आवाज दिला सदर प्रकारामुळे अपहरण करते दोन्ही इसम घाबरून पळून गेले व लूकमान ची सुटका झाली.

माथेरान मध्ये गुन्हेगारीचे प्रमाण अगदी नगण्य आहे लहान सहान भुरटेगिरी वगळता या ठिकाणी गुन्हे ना च्या बरोबर आहेत काही वेळा पर्यटकांमुळे येथे गुन्हे घडत असतात परंतु पहिल्यांदाच माथेरान मध्ये मुले पळविणारी टोळी सक्रिय झाल्याचे पहावयास मिळाले आहे ही अत्यंत गंभीर बाब असून माथेरान एक पर्यटन स्थळ असल्याने या ठिकाणी अनेक जण आपल्या लहान मुलांबरोबर फिरावयास येत असतात त्यामुळे मुले पळविणारी टोळी सक्रिय झालेली दिसल्याने माथेरानच्या पर्यटनावरती मोठे संकट सोडवण्याची भावना माथेरानमध्ये पसरली आहे माथेरान मध्ये नगरपालिकेने निवडक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते परंतु आता ते बंद झालेले आहेत त्यामुळे येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पुन्हा एकदा सुसज्ज असे सीसीटीव्ही कॅमेरे चौकाचौकांमध्ये बसवून तिसऱ्या डोळ्यामार्फत माथेरानच्या सुरक्षितेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला जावा अशी आशा येथील स्थानिक करत आहेत माथेरान मध्ये येण्याकरिता फक्त एकच मार्ग उपलब्ध असल्याने ह्या मार्गावरती तिसऱ्या डोळ्याने लक्ष ठेवणे गरजेचे असून त्याकरिता प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे आता पावसाळा संपताच माथेरानचा दिवाळी पर्यटन हंगाम सुरू होणार आहे त्या अगोदर सीसीटीव्हील प्राधान्य देऊन माथेरान पर्यटन स्थळ सुरक्षित होईल ह्या करता लक्ष देणे गरजेचे आहे मागे सुद्धा येथे पर्यटकांनी केलेल्या एका गुन्ह्याचा शोध सीसीटीव्हीमुळे तातडीने लागला होता परंतु त्यानंतरही सीसीटीव्हीचे महत्त्व प्रशासनाच्या लक्षात आले नव्हते परंतु आता मुले पळवण्याची टोळी सक्रिय झाल्याने सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाच्या ठिकाणी असणे ही काळाची गरज असून त्याकडे प्रशासनाने गांभीर्याने पहावे असे सर्व सामान्य मधून बोलले जात आहे. अंधाराचा फायदा घेऊन सदर अपहरण करता फरार झाले परंतु ह्या मार्गावर असलेल्या काही लॉजिंग व्यवसायिकांकडे सीसीटीव्ही बसविले गेले आहेत त्याचे फुटेज माथेरानचे एपीआय श्री शेखर लव्हे, तपासत असून या गंभीर गुन्ह्याच्या शोधा करता त्यांनी वेगवेगळे पथके बनवून तपास सुरू केलेला आहे लुकमानचे वडील यांनी सदर घटनेची तक्रार दाखल केली आहे.

# पन्हळघर ग्रामस्थांचा जिल्हाप्रमुख अनिल नवगणे यांच्या उपस्थितीत उद्धव सेना गटात जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । माणगव**

लोणेरे जवळील पन्हळघर गावातील अनेक ग्रामस्थांनी तसेच महिलांनी राष्ट्रवादीला व शिंदे गटाला राम राम ठोकत उद्धवसेने गटात जिल्हाप्रमुख अनिल नवगणे तसेच संजय कदम संपर्कप्रमुख यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश करून महाडचे आमदार भरत गोगोल्याने मोठा धक्का दिला आहे.



यावेळी विजयराज खुळे, संजय घोसाळकर, मोनिष टेंबे युवा विभाग प्रमुख, संपर्क प्रमुख बळीराम घाग, माणगाव तालुकाप्रमुख गजानन अधिकारी, लोणेरा गोरेगाव विभागप्रमुख प्रभाकर टेंबे, माणगाव नगरसेवक अजित तार्लेकर, ज्येष्ठ शिवसैनिक संजय घोसाळकर, सुरेश मनवे माजी उपसरपंच, भास्कर झोरे उपशाखाप्रमुख, राजा झोरे उपशाखाप्रमुख तसेच पन्हळघर ग्रामस्थ व झोरे वाडी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी व महिला वर्ग शिवबंधन बांधून यांनी विकास कामाला गती मिळावी म्हणून जाहीर प्रवेश केला. यावेळी समस्त ग्रामस्थ वर्गानी शिवसेना जिंदाबाद, उद्धव साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है. असा नारा देत शिवसेना मध्ये जाहीर प्रवेश केला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नविन पुल उभारणीसाठी तातडीने निधी मिळावा

नविन पनवेल यांना जोडणारा नविन पूल बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) दि. २२/११/२०१८ रोजी ३ कोटी रुपयांची मंजूरी मिळाली होती. सदर विकासकामे करण्यासाठी कार्यकारी अभियंता (बांधकाम) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे वर्ग करण्यात आली होती. परंतु हे रस्ते रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असणाऱ्या रस्त्यांवर येत नसल्यामुळे सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यासाठी कार्यकारी अभियंता, रा.जि.प. अलिबाग यांनी कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना दि.०७/०२/२०१९ रोजी पत्रान्वये कळविले आहे. परंतू या कामांना निधी अतिशय अल्प असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल, ही कामे करण्यास इच्छुक नसून सदर विकास कामे पूर्ण होण्यास बराच कालावधी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर पुलाच्या बांधणीसाठी अंदाजे रक्कम ७-८ कोटी रूपये लागणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी कळविले आहे.

त्या अनुषंगाने गाढी नदीवरीन विचुंबे गाव ते नविन पनवेल यांना जोडणारा नविन पुल उभारणीसाठी तातडीने निधी देण्याबाबत सहकार्य करावे, अशी मागणी नामदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

# भारतीय जनता पक्षा तर्फे आयोजित चौल येथील रक्तदान शिबिरास विक्रमी प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । ओमकार नागावकर**

**रेवदंडा** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसानिमित्त भारतभर सेवा पंधरवडा म्हणून विविध समाज उपयोगी कार्यक्रम जल्लोषात साजरे होत आहेत. अशातच राज्यात रक्तदानाचे महत्व समजून राज्यात होणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेता अलिबाग तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चा अध्यक्ष आलाप मढवी यांच्या पुढाकाराने चौल येथिल सुंदर नारायण मंदिरात आज दि.२० सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग येथील जिल्हा रूग्णालय रक्त केंद्राच्या साहाय्याने रक्तदान करण्यासाठी आलेल्या दात्याकडून रक्त संकलन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी देखील सहभाग दाखवला सौ. अश्विनी रामकृष्ण आठवले यांनी महिला म्हणून प्रथम रक्तदान करून मोलाचं सहभाग दाखवला.



अलिबाग तालुक्यातील चौल गा- वात सुंदर नारायण मंदिरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास विक्रमी प्रतिसाद मिळाला असून तब्बल १०२ रक्तदान दात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला पनवेल आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती देखील दिसून आली. नाना पालेकर ट्रस्ट मुंबईचे व्यवस्थापक कृष्णा महाडिक यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून, तर पनवेल आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शिबिरांची सुरुवात करण्यात आली. या वेळी शिवसेना जिल्हा परीषद विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांनी देखील आपली उपस्थीती दाखवली, चौल ग्रामपंचायतीचे उपसरपंच अजित गुरव यांनी देखील रक्तदान केले. तसेच रेवदंडा, थेरोंडा, चौल विविध गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावून रक्तदान केले.

तर यावेळी पनवेल आमदार प्रशांत ठाकूर, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर, जिल्हा चिटणीस समीर राणे, जिल्हा सांस्कृतिक सेल संयोजक केदार आठवले, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आलाप मढवी, आस्वाद मढवी, ज्येष्ठ नेते माणिक बळी, गजानन झेंडेकर, समीर घरत, श्रीम. आरती मढवी, ममता पटेल व इतर भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# तळोजा - खोणी मार्गावर खड्डयांमुळे तरुणाचा मृत्यू मनसे आक्रमक ; रास्ता रोकोचा दिला इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा - खोणी मार्गावर खड्ड्यामुळे एका २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याने मनसेने आक्रमक पवित्र घेतला येत्या सात दिवसात रस्ते दुरुस्ती न केल्यास त्याच ठिकाणी रस्ता रोको करण्याचा इशारा मनसेचे तालुका अध्यक्ष रामदास पाटील यांनी तळोजा एमआयडीसी प्रशासनाला दिला आहे. यावेळी रस्ते आस्थापना रायगड जिल्हा संघटक संजय तन्ना , सहकार सेना रायगड जिल्हा संघटक गिरीश तिवारी, तालुका उपाध्यक्ष कैलास माळी , उपशहर अध्यक्ष सुरज गायकर, विभाग अध्यक्ष योगेश पाटील ,अरविंद पाटील, कबीर गायकवाड, संतोष मिश्रा, तुळशीराम पाटील, नितेश पाटील, विश्वनाथ पाटील, प्रवीण म्हात्रे, राजू चव्हाण, सचिन भोईर, श्रवण पाटील, मयूर म्हात्रे, सुरज पाटील, रोशन पाटील तसेच मृत तरुणांचे नातेवाईक जीवन पाटील,सुभाष पाटील, अरुण पाटील आदी उपस्थित होते.

तळोजा - खोणी मार्गावरील उसाटणे येथे राहणारा समीर पाटील हा अभियंता असलेला २४ वर्षीय युवक नेहमीप्रमाणे तळोजा एमआयडीसी येथून कामावरून घरी जात होता. त्याची दुचाकी नितळस फाटा येथे आली असता त्याच्या दुचाकीला अपघात झाला. ज्या ठिकाणी हा अपघात झाला त्याठिकाणी खूप मोठं मोठे खड्डे पडलेले आहेत. त्या खड्ड्यात मोटार सायकल आदळुनच हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. या अपघातात समीर पाटील याचा जागीच मृत्यू झाला. हा मार्ग पनवेल आणि कल्याण शहराला जोडणारा मार्ग आहे . तळोजा एमआयडीसी मध्ये नोकरीनिमित्त येण्यासाठी जाण्यासाठी याचा मार्गाचा वापर करत असतात. सिमेंटने बनवलेला हा रस्ता सद्यस्थितीत अत्यंत खड्डेमय झालेला आहे. या सिमेंटच्या रस्त्यातून लोखंडी सळया दिसू लागल्या आहेत. या मार्गातून जाताना लहान वाहनांना खाद्यातून जाणे मुश्किल होत असते. या मार्गावर अद्यापपर्यंत अनेक अपघात होऊन अनेकांचे जीव देखील गेले आहेत. याबाबत तळोजा एमआयडीसी कडे अनेकांनी पत्रव्यवहार करून पाठपुरावा देखील केला परंतु प्रशासन लक्ष देत नाही. त्यामुळेच आणखी अपघात होत आहेत. यावरून पनवेल तालुका मनसेने आज सादत ठिकाणी धरणे आंदोलन केले. मनसेने एमआयडीसीविरोधात जोरदार घोषणाबाजी केली तसेच मृत्यू पावलेल्या तरुणास ज्या खड्ड्यामुळे त्याचा मृत्यू झाला त्या खड्ड्याजवळ श्रद्धांजली अर्पण केली. हा मार्ग बनवताना शेतकऱ्याच्या जमिनी संपादित केल्या पण त्याचा मोबदला मात्र त्यांना दिला नाही. त्यामुळे त्याचे रुंदीकरण करण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. पण खड्डे बुजवण्यास शेतकऱ्यांचा विरोध नाही. त्यामुळे एमआयडीसी प्रशासन या दोन्ही बाबींकडे दुर्लक्ष करत असल्याने मनसेने त्यांचा निषेध व्यक्त करीत येत्या सात दिवसात खड्डे बुजवले गेले नाही तर पनवेल तालुक्यातील मनसेचे कार्यकर्ते या ठिकाणी एकत्र जमून रस्ता रोको करतील असा इशारा यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष रामदास पाटील यांनी दिला आहे. .


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल निता बिपीन मढवी, किया बिपीन मढवी, कुशल बिपीन मढवी, आदिती बिपीन मढवी, नितीन धनाजी मढवी, सचिन धनाजी मढवी रा.गावठाण, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीची खालीलप्रमाणे मालमत्ता आहे. मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : गावठाण, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भोगवटादार |
|---|---|---|---|
| ३५/१/ब | ००.०६.६० | १.१९ | वर्ग-१ |

सदरहू मालमत्ता ही आमचे अशिल विक्री करू इच्छित आहेत. तरी सदरहू मालमत्तावर कोणाही व्यक्ती, संस्था किंवा कंपनी यांचा गहाण, दान, बक्षिस, हक्कसोड, विक्रीकरार, विकसनकरार, दावा, वहिवाट, ताबाकब्जा व इतर कोणताही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अगर कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर कळवावी. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही, तर सदरहू मालमत्तामध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही असे समजून सदरहू मालमत्तेचे हस्तांतरीत करण्यात येईल. परंतु मुदतीनंतर कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आल्यास, ते परिणामकारक तथा बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.२१/०९/२०२२
पनवेल

सही/-
**ॲड.नित्यानंद राम ठाकूर**
**मु.कोपर, पो.गव्हाण,**
**पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं. ९३२६०९०७००**
**८६५२८६३२०८**



मा.सोनावणे साहेब कोर्ट
**ॲड.प्रतिभा पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१३१९/२०२२
नि.नं.८
ने.ता.०४/११/२०२२

श्री.सुरेश तुकाराम कांबळे व इतर २ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मयत निर्मला तुकाराम कांबळे यांचे निधन दि.१२/०३/२०२२ रोजी प्लॉट नं.४९७, सेक्टर-२४, वहाळ (पुष्पक नगर), नवी मुंबई येथे झाले असून व सदर मयत अनिल नामदेव कडू यांच्या खालील नमूद मालकीच्या मिळकती संदर्भात मयत निर्मला तुकाराम कांबळे यांचे वारस असल्याबाबत अर्जदार यांनी वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**प्लॉट नं.४९७, सेक्टर-२४, वहाळ (पुष्पकनगर), नवी मुंबई**
**एकूण क्षेत्रफळ-१५० चौ.मी.**
**ज्याची किंमत एकूण रक्कम रु.१३,८१,५००/- एवढी आहे.**

त्याअर्थी सदर अर्जदार यास त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२१/०९/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिलेले आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सौ.सुनिता सुनील खुटले, रा.सुनील खुटले, घर नं.४८०, देऊळआळी, नांदगांव, पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचे मालकीची ग्रामपंचायत देवद, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हद्दीतील तसेच अधिकार क्षेत्रातील घर मिळकत आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : देवद, ता.पनवेल, जि.रायगड**

| घर नं./ मालमत्ता क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. | कराची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ३२९ | नवीन पद्धतीचे आरसीसी घर | ९३.७ | १८५३ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे देवद येथील ग्रुपग्रामपंचायत देवद, ता.पनवेल, जि.रायगड यांचे अधिकार क्षेत्रातील घर मिळकत ही सदर जाहीर नोटीसीचा विषय आहे. ही मिळकत सौ.सुनिता सुनील खुटले यांचेकडून आमचे अशिलांनी विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही सौ.सुनिता सुनील खुटले यांच्या मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जातील घर मिळकत आहे. वरील सदरहू मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे धरण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.२१/०९/२०२२

सही/-
**ॲड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४, गावदेवी मंदिरासमोर, रामगणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९८९७०६९**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कर्जत तालुक्यात एक दिवस ई-पीक पाहणीसाठी २३ सप्टेंबर रोजी विशेष मोहीम

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांसाठी दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी कर्जत तालुक्यातील सर्व गावांमध्ये एक दिवस ई–पीक पाहणी साठी एक दिवसीय विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी आपल्या शेतातील पीक पेरा आपण स्वतः ई–पीक पाहणी या मोबाईल प द्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. मागील खरीप व रब्बी हंगामामध्ये कर्जत तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई–पीक पाहणी स्वतः नोंदवली आहे. यावर्षी खरीप हंगामामध्ये आपल्या शेतामध्ये जे पीक पेरले आहे त्याची पिक पाहणी ही ई–पिक पाहणी मोबाईल प द्वारे नोंदवावी व आपला सातबारा वरील पेरा अद्ययावत करावा. आपल्या सातबारा वरील पीक पेरा अद्ययावत असणे हे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व उप विभागीय अधिकारी कर्जत अजित नैराळे यांचे मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी एक दिवसीय विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.या दिवशी प्रत्येक गावामध्ये कोतवाल, तलाठी हे उपस्थित राहून शेतकऱ्यांना ई–पीक पाहणी करण्यासाठी मार्गदर्शन करतील. मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तालुक्यातील गावांना भेटी देणार आहेत. गावातील सर्व ग्रामसेवक, कृषी सहायक, सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार या सर्वांनी तसेच त्या गावातील सर्व शेतकऱ्यांनी एक दिवशीय ई–पिक पाहणी मोहिमेमध्ये सहभाग घेऊन गावातील खरीप पिक पेऱ्याची १००% ई–पिक पाहणी ची अँप मध्ये नोंद होईल यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन कर्जत तहसीलदार डॉ.शीतल रसाळ यांनी केले आहे.

## सुधागड महसूल विभागातील अनेक पदे रिक्त ; कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील महसूल विभागात अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार पडत असून सर्वसामान्यांची कामे सुद्धा खोळंबत आहेत.



सुधागड–पाली तहसील कार्यालयात एक मंडळ अधिकारी, तीन महसूल सहाय्यक, एक तलाठी, तीन शिपाई व ७ कोतवाल अशी एकूण १५ पदे रिक्त आहेत. परिणामी, कामकाजात व्यत्यय निर्माण होत आहे. कार्यालयाशी संबंधित अनेक कामे प्रभारींच्या भरवशावर असल्याने कामांना विलंब होत आहे.

तलाठ्यांच्या रिक्त पदांचा भार इतर तलाठ्यांवर सोपविण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामपातळीवरील जनसामान्यांसह शेतकर्यांच्या विविध कामांचा खोळंबा होत आहे. त्याशिवाय महसुल सहाय्यक तसेच इतर काही विभागातील पदे रिक्त आहेत. या सर्व पदांना प्रशासकीय स्तरावर मान्यता असताना आणि येथील अधिकाऱ्यांकडून पाठपुरावा केला असतानाही सुद्धा ही पदे भरण्याबाबत वरिष्ठ पातळीवरील अधिकारी उदासीन असल्याचे दिसत आहे.

रिक्त पदांमुळे तालुक्यातील हजारो विद्यार्थी, शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांची अनेक कामे खोळंबत असल्याने त्यांना मोठा मनस्ताप होत आहे. त्याशिवाय रिक्त पदांचा प्रभार सांभाळणारे कर्मचारीही अतिरिक्त जबाबदारीमुळे आपल्या मूळ आस्थापनेच्या ठिकाणच्या कामांना न्याय देण्यात अपयशी ठरत आहेत. त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे.

संजय गांधी निराधार योजना विभागातील नायब तहसीलदार पद रद्द केले असल्याने त्या पदाला पुन्हा मंजुरी देण्याची प्रक्रिया खोळंबली आहे. तालुक्यातील हजारो निराधार, अपंग, वृद्ध लाभार्थींच्या मानधनाचा प्रश्न बिकट होत आहे. त्यामुळे या विभागातील नायब तहसीलदाराच्या पदाला पुन्हा त्वरीत मान्यता देण्याची मागणीही तालुक्यातील निराधार, अपंग, वृद्ध लाभार्थींकडून करण्यात येत आहे.

## रोहे तालुका शिक्षकेत्तर कर्मचारी अध्यक्षपदी प्रविण मरवडे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुका माध्य.व उच्च माध्यमिक शिक्षकेतर कर्मचारी संघाचे अध्यक्षपदी नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथील वरिष्ठ लेखनिक प्रविण मरवडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुका माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेची जनरल सभा दि.१८ रोजी मेहंदळे हायस्कूल रोहा येथे संपन्न झाली सदर सभेमध्ये सन २०२२ ते २५ करिता तालुका अध्यक्ष, उपाध्यक्ष व चार सदस्यांची निवड करण्यात आली.सदरची निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्हा संघाचे सहकार्यवाह मनोहर मोरे यांनी निरीक्षक म्हणून काम केले.या सहसभेत प्रवीण पांडुरंग मरवडे यांची एक मताने अध्यक्ष म्हणून निवड निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्षपदी श्रीराम घाग,सचिवअनिल खराडे,सहसचिव संतोष गोळे व खजिनदार म्हणून सुरेश गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.सभेचे सूत्रसंचालन मुरलीधर कोंजे यांनी उत्तम प्रकारे पार पाडले सर्व सभासदांच्या संमतीने सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली त्याबद्दल सर्व सभासदांचे हार्दिक आभार व्यक्त केले.तर नव्याने नियुक्ती करण्यात आलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे उपस्थितांनी अभिनंदन व्यक्त करून पुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

## कोविड काळात काम केलेल्या रुग्णवाहिके वरील वाहन चालक पगाराविना

**दै.रायगड नगरी । चौक**

चौक येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णवाहिकेवर गेली अनेक वर्ष कार्यरत असलेले वाहन चालक किशोर मालुसरे यांचा तीन महिन्याचा पगार, प्रवास भत्ता, नाईट चार्ज, अद्याप मिळालेला नाही. तीन वर्षाचा बोनस तसेच तीन वर्षाच्या पीएफ अद्याप मिळाले नाही.

महाभयंकर साथीमध्ये ज्यांनी आपल्या जीवाची परवा न करता रुग्णांची सेवा केली आहो रात्र मेहनत घेऊन ज्या ठिकाणी जावे लागते त्या ठिकाणाहून हॉस्पिटल, दवाखाना, येथे कोरोना पेशंटला ने– आण केली. गरुड झेप स्वयंरोजगार सहकारी सेवा, सातारा. यांच्या सेवेत ते काम करीत असून त्यांना वेतन वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यांच्या मुलाचे शिक्षणाचा खर्च, मोबाईल बिल, लाईट बिल , भरणे अवघड झाले आहे यासंबंधी त्यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता अद्याप त्यांना कोणत्याही प्रकारे मदत मिळालेली नाही.

शासनाचे गाईडलाईन दर महिन्याच्या दहा तारखेला वाहन चालकांचे वेतन देण्यात यावे. असे असून सुद्धा त्याचे पालन या संस्थेद्वारे करण्यात येत नाही. त्यामुळे त्यांनी संतप्त होऊन काम बंद ठेवले आहे रुग्णालयात काही अडचणी निर्माण झाल्यास किंवा कोणत्याही रुग्णास काही हानी पोहोचल्यास त्यास गरुड झेप सेवा सातारा व जिल्हा रुग्णालय अलिबाग तसेच ग्रामीण रुग्णालय, चौक हे जबाबदार असतील असे सांगितले. आम्हाला आमच्या कामाचा मोबदला वेळेवर मिळावा अशी संतप्त भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

## गणेश दर्शनासाठी भेट आलेल्या शालेय साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप

**दै.रायगड नगरी । पेण**

नुकताच गणेशोत्सव सण धुमधडाक्यात जरी पार पडला असला तरी या गणेशोत्सवादरम्यान सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या सहयाद्री विदयार्थी अकादमीने बाप्पाच्या दर्शनावेळी येताना प्रसाद म्हणून फळे, लाडू, पेढे न आणता शालेय साहित्य घेऊन येण्याचे आवाहन केले होते. गणेशभक्त एकमेकांच्या घरी विराजमान असणाऱ्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. सदर शैक्षणिक साहित्य सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानने एकत्र करून गरीब आणि गरजू अशा आदिवासी वाडीवरील विद्यार्थ्यांना वाटप केले आहे.

यावेळी सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष समीर म्हात्रे, तालुका अध्यक्ष केतन म्हात्रे, उपाध्यक्ष रोहित केणी, माजी तालुका अध्यक्ष रोशन टेमघरे, साईराज कदम, स्वप्नील म्हात्रे, विनोद म्हात्रे, नितीन म्हात्रे आदी प्रतिष्ठानचे मावळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना समीर म्हात्रे यांनी सांगितले की, आम्ही वाटप केलेले हे शैक्षणिक साहित्य म्हणजे सर्व विद्यार्थ्यांसाठी बाप्पाचा प्रसाद आहे. या साहित्याचा विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणासाठी चांगला वापर करून विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन उच्च पदावर नोकरीमध्ये रुजू होण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन समीर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना केले. सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानने पेण तालुक्यातील अराव, निंबारवाडी, शेडाशी, पाचगणी आणि वेताळपट्टी या पाच शाळेतील जवळपास दीडशे विद्यार्थ्यांना वही, पेन्सिल, पेन, शॉपनर, खोडरबर आदी शालेय साहित्य वाटप केले. यावेळी चंडीकादेवी माध्यमिक विद्यामंदिर आराव शाळेचे मुख्याध्यापक चोरमले, निंबारवाडी शाळेचे मुख्याध्यापक संजय कंक, पाचगणी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना राऊत, वेताळपट्टी शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील आदिंसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गणेशोत्सव काळात ज्या ज्या गणेशभक्तांनी विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य प्रसाद म्हणून बाप्पासमोर अर्पण केले, त्या सर्व गणेशभक्तांचे सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानने आभार मानले आहेत.



## पनवेल सीएसएमटी लोकलमध्ये मृतदेह सापडल्याने खळबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स ते पनवेल या लोकल गाडीमध्ये काल एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळी जावून मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला आहे.

रुग्णालयातील अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समजू शकेल, असे याविषयी माहिती देतांना पोलिसांनी सांगितले. मृत व्यक्ती ३५ ते ४० वर्षाची असून त्याची अद्यापी ओळख पटली नसून त्याबाबत पोलिसांनी पुढील प्रयत्न सुरू केले आहेत.

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३४५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/११/२०२२

१) श्रीमती.वनिता अनिल सगरे, वय : ६१ वर्षे
२) श्री.अभिजीत अनिल सगरे, वय : ३७ वर्षे
क्र.१ व २ रा.टाटा पॉवर कॉलनी,
टाईप १–सी/२ बी, आशिष थेटरचे जवळ,
आर.सी.मार्ग, चेंबुर, मुंबई ४०००७४
३) श्री.पवनकुमार अनिल सगरे, वय : ३१ वर्षे
रा.राज रेसिडेन्सी, फ्लॅट नं.५०४/ए–२,
राम मंदिर रोड, घोडबंदर रोड, ए.पी.शहा
इन्स्टिट्युट जवळ, ठाणे (पश्चिम), ४००६१५ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.अनिल धोंडीराम सगरे हे दि.१०/०९/२०१८ रोजी मौजे : सुराणा सेठीया हॉस्पिटल मुंबई येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मौजे : खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड येथील सर्व्हे नं.२९/१ (सिटी सर्व्हे नं.४३८४) आणि सर्व्हे नं.३१/१ (सीटी सर्व्हे नं.५३१४) या मिळकतीवर अस्तित्वात असलेल्या ''विरेश्वर'' या इमारतीमधील फ्लॅट नं.५०३, पाचवा मजला, बिल्डींग नं.२, क्षेत्र ७१९ चौ.फूट कारपेट अशा वर्णनाची सदनिका आहे. सदर सदनिकेची नोंद खोपोली नगरपरिषदेचे ॲसेसमेंट सदरी मालमत्ता क्र.W6Z3000135 (जुना मालमत्ता क्र.32/5R) कडे झालेली आहे.

अर्जदार हे कै.अनिल धोंडीराम सगरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनीही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१९/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साो

**ॲड.स.ग.रणदिवे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल

चौ.अर्ज क्र.९३५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२२

मनिष अक्षदिप सोनकर व इतर २
रा.१०४/ए/३६२, ३६३, ८० फूट,
रोड राम बाग कानपूर, उत्तर प्रदेश–२०८०१२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार १) मनिष अक्षदिप सोनकर व इतर २ रा.वरीलप्रमाणे यांनी या मे.न्यायालयात राजेंदीदेवी अक्षदिप सोनकर यांचे वारसदार आहेत म्हणून या न्यायालयात वारसदाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. राजेंदीदेवी अक्षदिप सोनकर या दि.०३/०१/२०११ रोजी कानपूर येथे मयत झाल्या आहेत. त्यांची खालील मिळकतीचे परिशिष्टात वर्णन केलेली मिळकती बाबत वारस दाखला मिळणे कामीची या मे.न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे ती मिळकत खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे परिशिष्ट**
**गांव मौजे शेलू, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमीन सर्व्हे नं.३८ चा हिस्सा नं.१२ चे एकूण क्षेत्र ० हेक्टर १३ गुंठे ० प्रति आकार ०९.०० रुपये जीचे ६९३६२००/– बाजारी मुल्यांकन आहे.**

अर्जदार यांचे अई नामे राजेंद्रिदेवी अक्षदिप सोनकर यांचे निधनानंतर वरील अर्जदार हे त्यांचे वारसदार आहेत असा वारस दाखला मिळणेकामी उपरोक्त न्यायालयात अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदार यांनी न्यायालयात त्यांना वारस दाखला मिळावा म्हणून केलेल्या अर्जास कोणाची काही हरकत, आक्षेप किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा काही दावा असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती व आक्षेप स्वतः अथवा आपले वकीलीमार्फत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे मुदतीत वर नमूद केलेल्या न्यायालयात हजर राहून लेखी स्वरुपात दाखल सादर कराव्यात. सदर प्रकरण सुनावणी कामी दि.३०/०९/२०२२ रोजी नेमण्यात आलेले आहे. मुदतीमध्ये आपल्या लेखी हरकती आक्षेप दाखल न केल्यास अर्जदार यांनी मागणी विनंती केल्याप्रमाणे योग्य तो न्यायिक आदेश पारित करण्यात येईल. आक्षेप हरकती मुदतीत न आल्यास त्या विचारात घेतल्या जाणार नाहीत. योग्य तो आदेश न्यायनिर्णय पारित करण्यात येईल याची सर्व जनतेने या जाहीर नोटीसीची नोंद घ्यावी असे सुचित करण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस आज दि.२१ माहे सप्टेंबर २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिली असे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साो

**ॲड.कुंदन कृष्णा पाटील**
**अर्जदार तर्फे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३४६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/११/२०२२

१) श्री.मोहम्मद सलीम शेख
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बिल्डींग नं.८/ए, फ्लॅट नं.१०३,
कपाडीया नगर, सीएसटी रोड, मिठी नदीच्या जवळ,
कुर्ला, मुंबई–४०००७०
२) सना नूर इस्लाम शेख
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मुबारक कॉम्प्लेक्स बिल्डींग नं.५, रुम नं.३०१,
विनोबा भावे नगर, खाळीलीया मस्जिद,
कुर्ला पश्चिम, कुर्ला, मुंबई–४०००७० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची आई कै.सबिला नुरीस्लाम शेख ही दि.१२/०३/२०१९ रोजी तळोजा पाचनंद, ता.पनवेल येथे राहते घरी मयत झाली आहे. तसेच त्यांचे वडील कै.नुरीस्लाम मुजिब शेख हे दि.०३/०३/२०१६ रोजी कुर्ला मुंबई येथे मयत झाले आहेत.

कै.सबिला नुरीस्लाम शेख यांचे नांवे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नांव | मिळकतीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड | एस.एम.हाईट, सदनिका क्र.१४०५, चौदावा मजला, प्लॉट नं.३४, सेक्टर–५, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र– २८.३३८ चौ.मी. कारपेट व टेरेस १०.८७६ चौ.मी. |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.सबिला नुरीस्लम शेख यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.सबिला नुरीस्लाम शेख यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.मुजावर साहेब कोर्ट

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.मेहबुब गै. पटेल**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३६५/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.०२/११/२०२२

१) श्रीमती.मुनीजा मोहम्मद उमर शेख
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बेगराजपूर गांव, पो.नहतौर,
बिजनौर, उत्तर प्रदेश–२४६७३३
२) श्री.इबनेसवूद मोहम्मद उमर शेख
वय : ५४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.बेगराजपूर गांव, पो.नहतौर,
बिजनौर, उत्तर प्रदेश–२४६७३३
३) श्री.शराफत मोहम्मद उमर शेख
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.कच्छी मोहल्ला, एम.जी.रोड,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
नं.१ ते ३ रा.कच्छी मोहल्ला, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.नजमा खातून कफिल शेख
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मुकरपूरी, स्योहारा, बिजनौर,
उत्तर प्रदेश २४६७४६
५) श्री.रियासत मोहम्मद उमर शेख
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.पोलीस स्टेशन रोड, म्हसवड,
ता.माण, जि.सातारा ४१५५०९
सध्या रा.कच्छी मोहल्ला, पनवेल
६) सौ.शबाना रईस शेख
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.६४४, सफाळे, ता.पालघर,
मिरानगर, उंबरपाडा, जि.ठाणे
७) सौ.रुकसाना फईम शेख
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.एडवण, उंबरपाडा, ता.पालघर, जि.ठाणे ४०११०२
८) श्री.नजाकत मोहम्मद उमर शेख
वय : ४७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.१८५, मुसलमान नाका, एम.जी.रोड,
नजाकत बेकरी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
९) श्री.जब्बार मोहम्मद उमर शेख
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
१०) श्री.इमरान मोहम्मद उमर शेख
वय : ३४ वर्षे, धंदा : व्यवसाय
११) मोहम्मद रिजवान मोहम्मद उमर शेख
वय : ३१ वर्षे, धंदा : व्यवसाय
१२) श्री.मोह. रेहान मोहम्मद उमर शेख
वय : २८ वर्षे, धंदा : व्यवसाय
नं.९ ते १२ रा.बेगरामपूर, नेहमोर,
जि.बिजनोर, उत्तर प्रदेश–२७४६७३३ अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे पती नं.२ ते १२ यांचे वडील कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख हे दि.०३/०६/२०१८ रोजी मयत झाले असून कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाच्या सदनिका व गाळा मिळकत असून सदर मिळकतीचे कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख हे रितसर मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिटी सर्व्हे नं.१८५, पश्चिमेकडील बेकरीचे घर व दुकानाचा गाळा ज्याची लांबी ४३.६ फुट (सुमारे १३.२१ मीटर) व रुंदी १२.३ फुट (सुमारे ३.८० मी)**
**पुर्वपश्चिम २५.३ फुट (सुमारे ७.६० मी.) व दक्षिणोत्तर ११.३ (सुमारे ३.४० मी) अशा मोजपाची मिळकत.**

येणेप्रमाणे सदनिका व गाळ्याचे वर्णन असून, सदरहू मिळकतींच्या अनुषंगाने कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारंचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घ्झेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.मोहम्मद उमर अजीमुल्ला उर्फ मोहम्मद उमर अजीमुल्ला शेख यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कोकण विभागातील ड्रोनद्वारे फवारणीचे माणगाव येथे प्रात्यक्षिक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा माणगाव व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२० सप्टेंबर रोजी कृषी संशोधन केंद्र रेपोली ता.माणगाव येथे कोकण विभागातील ड्रोनद्वारे फवारणी चे पहिले प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यावेळी विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे अंकुश माने व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले उपस्थित होत्या. यावेळी बायर क्रॉप सायन्स कंपनीचे प्रमुख सुशील देसाई, श्री.खांबेटे व सर्व टीम यांनी ड्रोनद्वारे फवारणी चे प्रात्यक्षिक करुन दाखविले. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून तयार केलेल्या ड्रोनद्वारे फवारणी कशी फायदेशीर आहे, मजूरांवर अवलंबून न राहता ड्रोनद्वारे फवारणीचा पर्याय वापरावा, असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी दापोली कीटकशास्त्र विभागाचे डॉ.नरेंगलकर यांनी कीटकनाशक फवारणी करताना काय काळजी घ्यावी, याबद्दल मार्गदर्शन केले. ड्रोनद्वारे फवारणी करताना ५-७ मिनिटांमध्ये एक एकर क्षेत्रावर फवारणी करण्यात आली. कर्जत कीटकशास्त्र विभागाचे डॉ.जळगावकर, संशोधन संचालक शिवराम भगत यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी माणगाव आनंद कांबळे, डॉ.दडेमाल, माणगाव तालुका कृषी अधिकारी आ.डी.पवार तसेच तालुक्यातील ८५ प्रगतशील शेतकरी, कलिंगड, कारली व भाजीपाला उत्पादक शेतकरी आणि महाड, पाली, तळा, रोहा येथील कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# माथेरान प्रवाशी कर संकलनाच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे लेखापरीक्षकांना संचालकांचे आदेश

## माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी केली होती मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या प्रवासी कर संकलनातील अनियमितता व आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी व संबंधितांवर कारवाई करण्यात यावी यासाठी माथेरानचे काँग्रेस पक्षाचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी दि.२ सप्टेंबर २०२१ रोजी उप संचालक, कोकण विभाग (नवी मुंबई) यांना विनंती अर्ज सादर केला होता याकामी एक वर्षाचा कालावधी लोटला असताना सुध्दा प्रवासी करातील अनियमिततेबाबत आणि आर्थिक गैरव्यवहार बाबत काहीच कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे उप संचालिका राजश्री ठोकळे यांनी स्थानिक लेखापरीक्षकाना चौकशी करून ताबडतोब अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

माथेरान नगरपालिकेने प्रवाशी कर संकलनासाठी खारघरच्या मल्टी सर्व्हिसेस या कंपनीला तीन वर्षांचा ठेका रक्कम रुपये १२ कोटी ६० हजार रुपयांना दिला होता. मात्र ठेकेदाराने दिलेल्या मुदतीत काम करण्यास टाळाटाळ केल्याने पालिकेने १६ ऑक्टोबर २० रोजी ठेकेदाराची अनामत रक्कम रु ७२ लाख ३ हजार जप्त करण्याचा ठराव संमत केला होता. कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती किंवा प्रवासी कर आकारणी बंद झाली तरी ठेकेदाराने पालिकेस निश्चित केलेली ठेक्याची रक्कम देणे बंधनकारक आहे. असे असताना देखील २७ मे २०२१ रोजी पालिकेने ठेकेदाराच्या फायद्याचे दोन ठराव संमत केले अनामत रक्कम जप्त करण्याऐवजी दि. २६ जून ते ३१ ऑक्टोबर पर्यंत ७०/३० टक्क्यांच्या समिकरणानुसार कर संकलन करणे व ठेकेदाराच्या मूळ रकमेत अडीच कोटी रुपये कमी करण्याचा ठराव संमत केला होता. त्यामुळे माथेरान नगरपालिकेस तीन कोटी दहा लाख साठ हजार रुपये इतका तोटा होणार असल्याने पालिकेचे इतके मोठे आर्थिक नुकसान होणार असून याचा थेट फायदा ठेकेदाराला होणार असल्याचे माथेरान शहर काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी सांगितले आहे.




मनोज खेडकर यांनी सदर आर्थिक गैरव्यवहाराची मुख्य लेखापरिक्षका द्वारे चौकशी करून पालिकेच्या आर्थिक नुकसानीची वसुली जबाबदार लोकप्रतिनिधी कडून करण्याची मागणी सह संचालक लेखा परिक्षकांकडे केली होती.त्यानुसार सह संचालिका राजश्री ठोकळे यांनी स्थानिक लेखापरीक्षकाना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

२०१६ मध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाल्यावर या सत्ताधाऱ्यांनी हम करेसो कायदा प्रमाणे वावर सुरू केला होता. एकदा संबंधित ठेकेदारांना कामाची परिभाषा समजावून सांगितल्यावर कामे कशी स्वरूपात होत आहेत याकडे जराही लक्ष दिले नाही. अशाचप्रकारे नगरपरिषदेचे सर्वाधिक उत्पन्नाच महत्वपूर्ण साधन असलेल्या प्रवासी कर ठेक्याच्या बाबतीत या सत्ताधारी गटाने केलेले असून अत्यंत चूकीच्या पद्धतीने प्रवासी कर ठेक्याचे वितरण करताना केवळ ठेकेदारांचे हीत जपलेले आहे त्यामुळे मोठया प्रमाणावर यात भ्रष्टाचार उघड झाला असून नगरपरिषदेचे प्रचंड प्रमाणात नुकसान करणाऱ्या सत्ताधारी मंडळींकडून सव्याज रक्कम वसूल करण्यात यावी असे काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी सांगितले.

ठेकेदारांच्या फायद्यासाठी करण्यात आलेल्या ७०/३० च्या फॉर्म्युल्या मुळे पालिकेला दि १५ सप्टेंबर २०२१ पर्यंत ४० लाखाचे नुकसान झाले व दुसऱ्या ठरवामुळे होणारे अडीच कोटी साठ हजार रुपयांचे नुकसान थांबवण्यासाठी पालिकेतील काँग्रेस पक्षाचे विरोधीपक्ष नेते शिवाजी शिंदे यांनी सुध्दा याच विषयाबद्दल दि.१० मार्च २०२१ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांच्या कडे मागणी केली होती.

# जुनी पेन्शन योजना लागु करण्यासाठी तळा तालुक्यात बाईक रॅलीचे आयोजन करून शासनाचे लक्ष वेधले

**दै.रायगड नगरी । तळा**

सन २००५ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना नविन पेन्शन योजना लागू करण्यात आली असून सदरची पेन्शन योजना ही अन्यायकारक असून जूनी पेन्शन योजना पुर्ववत करणेसाठी संपुर्ण महाराष्ट्रात आज दिनांक २१/९/२०२२ रोजी शासकीय कर्मचाऱ्यांनी य महाराष्ट्र राज्य मध्यर्वती कर्मचारी संघटनेच्या आदेशाने भुषण विश्वासराव पाटील, अध्यक्ष तळा तालुका तथा सरचिटणीस रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना यांचे नेतृत्वाखाली बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



तळा तहसिलदार कार्यालय ते तळा शहर बळीचानाका व तहसिलदार कार्यालय अशा मार्गाने आपल्या न्याय हक्काच्या मागणीसाठी बाईक रॅली काढली व शांततेच्या तसेच सविंधानीक मार्गाने तहसिलदार कार्यालयाच्या मैदानात मार्गाने घोषणा बाजी करीत तहसिलदार तळा ह्यांना निवेदन सादर केले. यावेळी संबोधित करताना भुषण पाटील यांनी PFRDA कायदा तातडीने रद्द करुन सन २००५ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या सर्वच शासकीय / निमशासकीय कर्मचारी यांना जूनी पेन्शन योजना लागू करणे बाबत मागणी केली तसेच इतर अनेक मागण्या ज्या शासन दरबारी प्रलंबित आहेत त्यांचा निपटारा राज्य सरकारने तातडीने करणे बाबत देखील मागणी केली सदर आंदोलनात तळा तालुक्यातील महसूल, वन व इतर सर्वच शासकीय विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते.

# रस्त्यावरील उनाड गुरे वाहनचालकांची डोकेदुखी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून उनाडगुरांचे कळप वाहनचालकांची डोकेदुखी ठरत असून वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागत असून याकडे संबंधितांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच या रस्त्यावर बोर्ली-ताराबंदर वळण, मजगांवपूल-एस.टी. स्टँड, विहूर रस्त्यावर वळणावर उनाड गुरांचा हैदोस असून मुरुडकडे व अलिबाग कडे जाणा-या वाहनचालकांची डोकेदुखी होऊन बसली आहे.

या रस्त्यावर गुरांच्या ठिय्या मुळे रात्रौ-अपरात्रौ विशेष करून काळ्या रंगाची भर रस्त्यात बसलेली गुरे अनवधानाने दिसण्यात न आल्यास वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागून जिवित व वित्त हानीची शक्यता नाकारता येत नाही.

मागील काळात ग्रामपंचायतीची असलेली कोंडवाडा संकल्पना संपुष्टात आल्याने या त्रासात अधिकच भर पडल्याचे चित्र दिसून येत असून रस्त्यावर असणा-या उनाड गुरांकडे संबंधितांचे जाणीव पूर्वक दुर्लक्ष व वेळप्रसंगी अपघाची शक्यता लक्षात घेऊन रस्त्यावरील उनाड गुरांचा बंदोबस्त व्हावा. अशी मागणी वाहनचालक, प्रवासी व नागरिकांतून होत आहे.



# कर्जत तालुक्यातील बौद्ध समाजाचा तहसिल कार्यालयावर ऐतिहासिक विराट मोर्चा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील बौद्ध समाजाच्यावतीने तह-सील कार्यालयावर विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यावरून तहसिल कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस मोर्चा तहसिल कार्यालयावर गेल्यानंतर पोलिसानी तहसील कार्यालयाच्या गेटवर मोर्चा अडवला. त्यावेळी उपस्थित समुदायास राहुल डाळींबकर, अँड. कैलास मोरे, सुनिल जाधव, अँड. सुमित साबळे, उत्तमभाई जाधव, नगरसेवक उमेश गायकवाड,धर्मेंद्र मोरे, हरिश्चंद्र यादव, सुभाष गवळे, सुनिल गायकवाड, रजनी गायकवाड, हिराबाई हिरे, पवार, वैभव केदारी, सम्यक सदावर्ते यांनी मार्गदर्शन केले. यावेळेस सूत्रसंचालन अरविंद मोरे यांनी केले तर आभार सुनिल देहु गायकवाड यांनी केले.



त्यानंतर शिष्टमंडळाने तहसिलदार डॉ. शितल रसाळ यांना निवेदन देवुन शासनाकडे सबंधित महिलेने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाबददल अपशब्द व अवमानकारक पोस्ट फेसबुकवर केली होती सदर प्रकरणामध्ये पोलिसांनी त्या पोस्टला समर्थन करणा-या आरोपींना अटक केलेली नाही तर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षण सोडतीत बौद्ध समाजावर झालेल्या अन्यायाबाबत योग्य ती भुमिका प्रशासनाने न घेतल्यास यापेक्षा तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला. सदर मोर्चामध्ये कर्जत तालुक्यातील सर्व पक्ष, संस्था, संघटना तसेच बौद्ध महिला, पुरुष, विद्यार्थी, वयोवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.मनिष पाटील यांचे उरण तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण तात्पुरते स्थगित

**दै.रायगड नगरी । उरण**

दिघोडे ता. उरण, जि. रायगड येथे हेटवणे ते नवी मुंबई या मार्गावरील सिडको प्रशास-नाची जलवाहिनी फुटल्यामुळे त्यामधुन वेगाने येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात दिघोडे गावातील पाईप लाईनच्या लगत असलेल्या अनेक घरांमध्ये पाणी घुसून नागरिकांच्या घरांचे व त्यामधील साहित्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याबाबतचे पंचनामे तलाठी वेश्वी, ग्रामसेवक दिघोडे, सरपंच दिघोडे यांनी केले होते. सदर दिघोडे गावातील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात येईल असे आश्वासन सिडको प्रशासनाकडून ग्रामस्थांना देण्यात आले होते. मात्र दिड वर्षे उलटूनही नुकसानग्रस्तांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही. याबाबत सिडको प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही आज दीड वर्षाहून अधिक काळ होऊन सुद्धा सिडको प्रशासन नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत होती. नुकसानग्रस्त व्यक्तींची कोणीच दखल घेत नसल्याने दिघोडे येथील एकूण १८ नुकसानग्रस्त ग्रामस्थांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी या प्रमुख मागणीसाठी उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष अनंत पाटील यांनी उरण तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले होते.दिनांक १९/०९/२०२२ रोजी आंदोलनाचा पहिला दिवस होता. दिनांक



२०/९/२०२२ रोजी आंदोलनाचा दुसरा दिवस होता. दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक २०/९/२०२२ रोजी संध्याकाळी ७ वाजता डॉ मनिष पाटील यांच्या सोबत बसलेल्या दिघोडे ग्रामस्थांचे मागण्या मान्य करण्यात आले असून नुकसान ग्रस्त व्यक्तींना १५ दिवसाच्या आत आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे सिडको प्रशासनाने कबूल केले आहे. त्यामुळे डॉ मनिष पाटील व त्यांच्या सोबत उपोषणाला बसलेल्या नुकसान ग्रस्त ग्रामस्थ यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामी कामगार नेते तथा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. कामगार नेते महेंद्र घरत यांच्यामुळेच सर्व सूत्रे पटापट हलली व आम्हाला लवकर न्याय मिळाला अशी भावना डॉ मनिष पाटील व उपोषण कर्त्यांनी व्यक्त केली. महेंद्र घरत यांचे यावेळी आभारही मानण्यात आले.

रायगड जिल्हा जेष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उपाध्यक्ष किरीट पाटील,रायगड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस रामनाथ पंडित, शहराध्यक्ष प्रकाश पाटील, तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, महिला तालुकाध्यक्ष रेखा घरत, महिला तालुका उपाध्यक्ष निर्मला पाटील,मच्छीमार नेते मार्तंड नाखवा,माजी नगरसेवक बबन कांबळे, विभाग प्रमुख विनोद पाटील, श्रेयश घरत, विवेक म्हात्रे, कीर्ती ठाकूर, रंजित ठाकूर, अफशा मुकरी, सदानंद पाटील, मंगेश म्हात्रे आदी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपोषण स्थळी उपस्थित होते. या उपोषणाला काँग्रेस पक्षाने जाहीर पाठिंबा दिला असल्याने ही समस्या त्वरित मार्गी लागली त्यामुळे यावेळी डॉ मनिष पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# सरकारी कर्मचारी व शिक्षक यांची सुधागड पाली येथे बाईक रॅली

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

महाराष्ट्र शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून शासकीय सेवेत येणाऱ्या कर्मचारी यांना नविन राष्ट्रीय पेन्शन योजना लागू केली आहे. ही योजना अन्यायकारक असुन सर्वाना जुनी परिभाषित पेन्शन योजना लागू करावी या मागणी करीता राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, तसेच राज्य सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या माध्यमातून सातत्याने विविध आंदोलन करीत आहे.

या अन्यायकारक योजने विरोधात अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघ सुध्दा संघर्ष करीत आहे. महाराष्ट्र शासनाने कर्मचाऱ्यांच्या या जिव्हाळयाच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष देवून सर्वाना जूनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीकरीता दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात बाईक रॅली आयोजित करण्यात आली. सुधागड तालुक्यात बाईक रॅली आयोजित करण्यात आली.

सर्वाना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत केंद्र व राज्य शासन गंभीर नाही. केंद्र सरकारने PFRDA कायदा मंजूर केला आहे. नविन अंशदायी पेन्शन योजना ही योजना अत्यंत धोकादायक आहे. म्हणूनच PFRDA कायदा रद्द करुन सर्वाना जूनी पेन्शन योजना लागू करण्याकरीता देश पातळीवर आंदोलन उभारण्यात आले आहे. कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर सुरक्षीत जीवनाकरीता पेन्शन मिळणे हे उतारवयातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या हिताचे आहे. सामाजिक स्वास्थ्याकरीता कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळणे आवश्यक आहे. याच कारणाकरीता सर्व कर्मचारी शिक्षक यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट यांना निवेदनाव्दारे सर्वाना जुनी परिभाषित पेन्शन योजना लागू करावी ही मागणी केली आहे.

सुधागड पाली येथे ही रॅली सकाळी १० वा. सुरू झाली. तहसिलदार कार्यालय, येथे समारोप करण्यात आला.सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचारी व संघटनेच्या पदाधिकारी यांनी मा. तहसिलदार यांना निवेदन सादर केले. या रॅली मध्ये राज्य सर्व सरकारी कार्यालयातील कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सुधागड तालुका राज्य मध्यवर्ती संघटना सुधागड तालुका राज्य मध्यवर्ती संघटना अध्यक्ष जावेद जमादार, सरचिटणीस कमळेश गुंड, ज्ञानेश्वर बोडके ,श्रीकांत इचके ,श्रेया रावकर, सुनिता डाके, सरला क-हाळे, योगेश पवार,अमित यरवट, मच्छिंद्र शेवाळे, मोरे तात्या, श्री.खंकल, लक्ष्मी पाटील, दत्तगुरु सरनाईक,वारगुडे, मयेकर, पंचायत समिती सुधागड पाली ग्रामसेवक ए.जी.खेडेकर, मयूर कारखानिस, ईश्वर पवार, सचिन केंद्रे, समाधान मराठे, यांच्यासह सर्व ग्रामसेवक तसेच मोरेश्वर कांबळे, राजेंद्र देसाई यांच्यासह सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचारी पदाधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



# बोर्लीपंचतन येथे पकडली तब्बल दोनशे लिटर गावठी दारू

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोर्लीपंचतन येथे तब्बल दोनशे लिटर गावठी दारू पोलिसांनी पकडली आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात कडक दारू बंदी करण्यात आली असून दिघी सागरी पोलीस गावोगावी फिरून अंमलबजावणी करत असताना दारू छुप्या मार्गाने मागवली जात असल्याचे समोर आले आहे. महिलांनी गावठी दारूबंदी विरुद्ध मोर्चा काढल्यानंतर ही पोलिसांची कामगिरी महत्वाची आहे.




याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नु-सार, मुरुड येथून श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथे कुणीतरी दारू मागवली असुन एका खाजगी वाहनाने येत असल्याची गोपनीय माहिती दिघी सागरी पोलिस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांना मिळाली होती. त्यानुसार तपासाची चक्रे फिरवत सहा उपनिरीक्षक सचिन निमकर, चव्हान, वाहतूक शाखेचे शशिकांत भोकरे यांच्या सह पोलीस कर्मचारी कैलास बेल्हेकर, सूरज शेडगे, रसाळ, शिदे यांनी सापळा रचला. यावेळी टेम्पो ट्रॅव्हलर क्र एम एच ०६ एस ८०५२ वाहनांची हालचाल संशयास्पद वाटल्याने गाडीचा पाठलाग करत सदर गाडी बोर्ली पंचतन येथे लावलेल्या नाकाबंदी मधे पकडण्यात आली. सदर वाहनाची तपासणी करत असताना गाडीत तब्बल २०० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली व दारू वाहतूक करणारे आरोपी भारत राघो हिरवे, संगीता भारत हिरवे, व ड्राइव्हर अभिजित अशोक श्रीवर्धनकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. विशेष म्हणजे ही वाहतूक टायरच्या ट्यूब मधून केली जात होती. पोलिसांनी २० हजारांची दारू व ३ लाखांची टेम्पो ट्रॅव्हलर ताब्यात घेतली आहे.

प्राथमिक चौकशी दरम्यान, ही दारू रोहा तालुक्यातील गोपळवट (पो. भालगाव) येथून घेऊन श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काही गावांमध्ये घेऊन जात असल्याची कबुली आरोपी यांनी पोलिसांना दिली. आरोपीच्या विरोधात दिघी सागरी पोलीस ठाण्यात दारू बंदी च्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हाचा तपास स.पोलीस निरीक्षक संदिप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार निमकर हे अधिक तपास करत आहेत. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात गावठी दारू तस्करी करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवलल्याने दिघी सागरी पोलिसांवर अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.